# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर
# दिनांक २५/०६/२०२३ (रविवार)

..................................................................................

## अपघातात मृत्यु

**पोलीस स्टेशन रामटेक** :– अंतर्गत नागार्जुन हनुमान मंदीर रामटेक. येथे दिनांक २३.०६.२०२३ चे २२.०० वा. ते २२.१५ वा. दरम्यान, यातील मृतक फिर्यादीचा चुलत भाउ नामे– **दिलीप रामलाल चकोले वय ५० वर्षे** रा बोरी ता रामटेक हा आपल्या मोटर सायकल क्र एम एच ४० बी वाय ७३९८ ने बोरी वरुन काही कामा निमित्त सांयकाळी. अंदाजे १९.०० वा सुमारास रामटेक येथे आला होता. काम आटोपुन रात्री २२.०० वा मोटर सायकल क्र एम एच ४० बी वाय ७३९८ ने एकटाच बोरी येथे जात असतांना, रामटेक तुमसर रोडवर नागार्जुन हनुमान मंदीर जवळ मागुन येणा–या अज्ञात वाहन चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजी पणे चालवुन फिर्यादीचे चुलत भावाचे मोटर सायकल ला जबर धडक मारल्याने मृतक खाली पडुन गंभीर जखमी होवुन डोक्याला, पायाला, गंभीर मार लागुन जागीच मरण पावले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– गजानन लक्ष्मण चकोले वय ४१ वर्ष रा. बोरी ता. रामटेक यांचे रिपोर्टवरून पोस्टे रामटेक येथे अज्ञात वाहन चालकाविरूध्द कलम २७९,३०४ (अ) भा.द.वि. सहकलम १८४ मोटर वाहन कायदान्वयें गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हयाचा पुढील तपास– सपोनि/पांडे मो.क्र ९८८१६८३१८४ हे करीत आहे.

## अल्पवयीन मुलीला पळवुन नेणे

**पोलीस स्टेशन पारशिवनी** :–अंतर्गत मौजा कोलारी. यातील फिर्यादीची अल्पवयीन मुलगी वय १७ वर्षे ११ महिने ही भिवापुर महाविद्यालय येथे बी ए प्रथम वर्षाकरीता एडमिशन करण्याकरीता जाते, असे सांगुन घरून निघुन गेली, व परत आलीच नाही. तिच्या मोबाईलवर फोन केला असता मोबाईल बंद होता. दि. २३/०६/२०२३ रोजी फिर्यादीने मुलीची सकाळी वाट बघितली असता, ती घरी परत न आल्याने फिर्यादीने भिवापुर कॉलेज महाविद्यालय येथे चौकशी केली मुलगी कॉलेज मध्ये आली नसल्याचे माहीती झाल्याने नातेवाईकांकडे व आजुबाजुला शोध घेतला असता मुलगी मिळुन न आल्याने तिला कोणीतरी अज्ञात इसमाने फुस लावुन पळवुन नेले आहे

सदर प्रकरणी फिर्यादी पिडीतेचे रिपोर्टवरुन पोस्टे पारशिवनी येथे अज्ञात आरोपी विरूध्द कलम ३६३ भा.द.वी. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास परी. पोलीस उपअधीक्षक राहुल झालटे पो.स्टे. भिवापुर मो.क्र. ९९८७३९६९३८ हे करीत आहे.

**पोलीस उपनिरीक्षक भारत थिटे**
**मो क्र ९४२२६१४६३३**
**पोलीस माहीती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण),नागपुर**